

नवरात्र उत्सव 2026



शिल्पकार विकासाचा...

देशदूत



इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २९ । अंक २९२ । शनिवार, दि.१७ ऑक्टोबर २०२६ । पाने-१०

मोबाईल आवृत्ती वाचा व वर



सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर 50% पर्यंत सूट

नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर 100% पर्यंत सूट

१५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत साप्ताहिक सुट्टी नाही.
आमची सर्व दालने दररोज आपल्या सेवेत सुरु राहतील.

पु. ना. गाडगीळ आणि सन्स
१८३२
सोने । चांदी । रत्ने

फेदरलाईट कलेक्शन

सोन्याचे दागिने आता फक्त १.५ ग्रॅमपासून

बहिणाबाई गार्डन जवळ, रिंग रोड, जळगाव
७४४७७१९४१५

पारोळा रोड, धुळे
९८९०५४३७८७

परदेशीपुरा, नंदुरबार
७०२८८८६९५०

ऑफर १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत । नियम आणि अटी

गोव्यात ५० हून अधिक देशांचे प्रतिनिधी एकत्र येणार!

पणजी । गोव्याला जागतिक व्यापार आणि गुंतवणुकीचे केंद्र म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने व्हायब्रंट गोवा ग्लोबल बिझनेस समिट २०२६चे आयोजन २९ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान करण्यात आले आहे. गोवा विद्यापीठातील डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियम, सांताक्रूझ येथे ही परिषद होणार आहे. व्हायब्रंट गोवा फाउंडेशन आणि गोवा सरकारच्या उद्योग, व्यापार व वाणिज्य संचालनालयाच्या सहकार्याने आयोजित या परिषदेत उत्पादन, व्यापार आणि उद्योजकतेला चालना देण्यावर भर दिला जाणार आहे. परिषदेचे अध्यक्ष विनय वर्मा आहेत. या परिषदेत ५० हून अधिक देशांतील प्रतिनिधी सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

आमदार निवासाची कामे दर्जेदार करा!



मुंबई । राज्यातील शासकीय इमारतींच्या बांधकाम आणि नूतनीकरणाची कामे दर्जेदार, नियोजनबद्ध आणि निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासोबतच रस्ते विकासकामांना गती देण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गुरुवारी मंत्रालयात आयोजित बैठकीत विविध विकासकामांचा आढावा घेतला. यावेळी भोसले यांनी एअर इंडिया इमारतीचे नूतनीकरण, मंत्रालय परिसरातील नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम, मनोरा आमदार निवासाच्या पुनर्बांधणीचे काम याबाबत अधिकाऱ्यांना विविध सूचना केल्या. मुंबईतील नरिमन पॉईंट येथील राज्य सरकारच्या ताब्यातील एअर इंडिया इमारतीच्या नूतनीकरणासंदर्भात स्थापत्य आणि विद्युत कामांची सद्यस्थिती, प्रशासकीय कार्यवाही आणि पुढील नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

केळी भाव

नवती (१) : 1900
नवती (२) : 1300

मिस्किली



मालेगाव चिमुरडी अत्याचार प्रकरणाचा निकाल लागला

आरोपीला फाशीची शिक्षा

मालेगाव । नाशिकच्या मालेगावातील डोंगराळे बालिका अत्याचार-हत्या प्रकरणाचा शुक्रवारी फैसला झाला. मालेगाव अपर जिल्हा व सत्र न्यायालयात आज शुक्रवारी निकाल जाहीर करत आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली. या प्रकरणात कोर्टाने दुर्मिळातील दुर्मिळ प्रकरण म्हणत नराधमाला फाशीची दिली. या प्रकरणाच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलं होते.



मालेगावच्या डोंगराळे भागात १६ नोव्हेंबर २०२५ रोजी ही घटना घडली होती. आरोपी विजय खैरनार यावर दोषी असल्याचे आरोपी निश्चिती झाली होती. या प्रकरणात शासन नियुक्त विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी बाजू मांडली. तर आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात येत होती. त्यानंतर आज कोर्टाने न्याय दिल्याने मालेगावकरांनी समाधान व्यक्त केले. या प्रकरणात पीडित कुटुंबीयांना दहा लाखांची मदत देण्यात आली. कोर्टात प्रत्यक्षदर्शी महिलेची साक्ष महत्वाची ठरली. नराधमाने चॉकलेटचे आमिष देऊन पीडित मुलीवर अत्याचार केला होता.



ॲड.उज्ज्वल निकमांनी मांडली बाजू

या संवेदनशील प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून खा.ॲड.उज्ज्वल निकम यांची सरकारने नियुक्ती केली होती. चार वर्षीय बालिकेवर अत्याचार झाल्यानंतर राज्यभरात त्याचे पडसाद उमटले होते. त्यामुळे सरकारने या प्रकरणाची तत्काळ सुनावणी करण्याचे आदेश दिले होते. अनेक पुराव्यांचा अभाव असतांनादेखील विशेष सरकारी वकील खा.ॲड. उज्ज्वल निकम यांनी अटक केलेल्या आरोपीच्या माध्यमातून या प्रकरणाच्या मुळापर्यंत जात पुरावे शोधून काढले व ते न्यायालयासमोर दाखल केले. ॲड.निकम यांच्या या पाठपुरव्यामुळे आरोपीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आल्याने मालेगावसह परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

५ हजारांत दिवाळी साजरी होणार नाही-खा.आठवले



मुंबई । दुष्काळामुळे शेतकऱ्यांसह जनावरांचीही अवस्था बिकट झाली असून, सरकारने जाहीर केलेली ५ हजार रुपयांची मदत पुरेशी नसल्याचे आठवले यांनी म्हटले आहे. या मदतीत वाढ व्हावी आणि शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक दिलासा मिळावा, यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचे रामदास आठवले यांनी स्पष्ट केले.

१९७२ च्या दुष्काळाची आठवण करून देताना निसर्गातील अनियमित बदलांचा अभ्यास करण्याची गरज असल्याचे रामदास आठवले म्हणाले. ज्या भागात अधिक पाऊस पडतो, तिथले पाणी कमी पावसाच्या भागात वळवण्यासाठी नदीजोड प्रकल्प आणि धरणांच्या कामांना महत्त्व द्यायला हवे, अशी भूमिका त्यांनी मांडली. केंद्र सरकारकडून दुष्काळासाठी मदत मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त करताना मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्य सरकारला यासंदर्भात जाणीव असून दिवाळीआधी दिले जाणारे पैसे पुरेसे नसले तरी केंद्र सरकार लवकरच राज्याला दुष्काळासंदर्भात मदत करणार असून यानंतर मिळणारा निधी हा समाधानकारक असेल, असेदेखील खा.आठवले यावेळी म्हणाले.

हजाराची लाच भोवली : दोघे गजाआड

भुसावळ । जमीन मोजणीसंदर्भातील प्रकरणातील त्रुटी दूर करण्यासाठी एक हजार रुपयांची लाच मागून ती स्वीकारण्याच्या प्रकरणात जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) कारवाई केली आहे.

या कारवाईत भुसावळ भूमी अभिलेख कार्यालयातील शिपाई सचिन पाटील आणि भुसावळ शहरातील आपले सरकार सेतू सुविधा केंद्र चालक राकेश चव्हाण या दोघांना अटक करण्यात आली. या कारवाईमुळे शहरातील शासकीय कार्यालयांशी संबंधित वर्तुळात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने जमीन मोजणीसंदर्भात भूमी अभिलेख कार्यालयात अर्ज केला होता. या अर्जामध्ये काही त्रुटी असल्याचे सांगण्यात आले. संबंधित त्रुटी दूर करण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालयातील शिपाई सचिन पाटील याने तक्रारदाराकडे एक हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे.

या प्रकारानंतर तक्रारदाराने जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीच्या अनुषंगाने एसीबीच्या पथकाने पडताळणी केली आणि त्यानंतर सापळा रचण्यात आला.

टीव्ही टॉवर परिसरात सापळा

एसीबीच्या पडताळणी-दरम्यान भुसावळ शहरातील टीव्ही टॉवर परिसरात आपले सरकार सेतू सुविधा केंद्र चालक राकेश चव्हाण याने लाचेची मागणी करण्यास प्रोत्साहन दिल्याचे स्पष्ट झाल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर एसीबीच्या पथकाने सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत सचिन पाटील आणि राकेश चव्हाण या दोघांना अटक करण्यात आली आहे.

जळगाव एसीबीचे पोलीस उपअधीक्षक योगेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक हेमंत नागरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही सापळा रचून कारवाई यशस्वी केली.

खासगी रुग्णालयांना दरपत्रक बंधनकारक

मुंबई । राज्यातील खासगी रुग्णालयांना उपचार, तपासण्या आणि विविध वैद्यकीय सुविधांचे दर मराठी आणि इंग्रजी भाषेत ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने शुक्रवारी यासंदर्भातील शासन परिपत्रक जारी केले. दरपत्रक लपवणे किंवा शुल्काबाबत संदिग्धता ठेवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांवर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा विभागाने दिला आहे. महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी कायदा आणि नियमावली २०२१ मधील अनुसूची ३ नुसार वैद्यकीय सेवा आणि रुग्णालयातील सुविधांचे दर प्रदर्शित करणे आवश्यक आहे.



मुंबई । शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते अभय दुबे यांनी ठाकरे गटाला रामराम करत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचा श्रीगणेशाची मूर्ती देवून सत्कार केला.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार निवड समितीची पुनर्रचना

मुंबई । राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी गठीत निवड समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. या समितीत पाच नव्या अशासकीय सदस्यांचा समावेश करण्यात आला असून सांस्कृतिक कार्य विभागाने शुक्रवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. मुख्यमंत्री अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री उपाध्यक्ष असलेल्या या समितीत सदस्य म्हणून सांस्कृतिक कार्य मंत्री, या विभागाचे राज्यमंत्री आणि विभागाचे सचिव यांचा समावेश आहे. तर सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक हे या समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत. या समितीत अशासकीय सदस्य म्हणून प्रख्यात नेत्रतज्ज्ञ डॉ. तात्याराव लहाने, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, क्रीडापटू अंजली भागवत, अभिनेते अशोक सराफ आणि उद्योजक दिलीप दांडेकर यांचा समावेश आहे. ही समिती शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी किंवा समितीची पुनर्रचना होणे यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत कार्यरत असेल, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

संसदेच्या विशेष अधिवेशनाची तयारी

परिसीमन व महिला आरक्षण मांडणार!

नवी दिल्ली । केंद्र सरकार याच महिन्याच्या अखेरीपर्यंत संसदेचे विशेष अधिवेशन बोलवण्याची शक्यता आहे. सरकार याच अधिवेशनात परिसीमन आणि महिला आरक्षणाशी संबंधित संविधान दुरुस्ती विधेयक आणण्याच्या तयारीत आहे. लोकसभेत हे विधेयक पास करण्यासाठी त्यांच्याकडे योग्य संख्याबळ असल्याचा सरकारला विश्वास आहे.

विशेष म्हणजे, विरोधकांकडून एसआयआर आणि मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात आंदोलन सुरू आहे. अशावेळी सरकारने विशेष अधिवेशन बोलावण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. दरम्यान, अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर डीएमके आणि काही छोट्या पक्षांशी केंद्र सरकार चर्चा करत असल्याचंही



सांगितले जात आहे.

सरकारला लोकसभेतील आपल्या संख्याबळावर विश्वास आहे. याच भरोश्यावर केंद्र सरकारने विशेष अधिवेशन बोलावून प्रस्तावित विधेयकं मंजूर करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. तसेच विरोधी पक्षांशीही संपर्क करून आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्नही केंद्र सरकारने सुरू केला आहे. संसदेचे पावसाळी अधिवेशन १३ ऑगस्ट रोजी संपले होते. पण अधिवेशनाचे सूप वाजले नव्हते. म्हणजे अधिवेशन संपले होते. पण औपचारिकरित्या अधिवेशनाचे सूप वाजले नव्हते. त्यामुळेच विशेष बैठक बोलावण्याचा मार्ग खुला आहे. दरम्यान, विशेष अधिवेशनाची तारीख आणि कार्यक्रम निश्चित करण्याची तयारी सरकारने सुरू केली आहे.

डीएमकेशी सरकारने केली चर्चा सुरु

यावेळी केंद्र सरकारकडून द्रविड मुनेत्र कळघम म्हणजे डीएमकेशी चर्चा सुरू आहे. तामिळनाडूत डीएमके काँग्रेसपासून वेगळी झाली आहे. तसेच डीएमकने इंडिया आघाडीशी फारकतही घेतली आहे. त्यामुळेच केंद्र सरकारने डीएमकेवर जाळं पसरवण्यास सुरुवात केली आहे. त्याशिवाय अन्य छोट्या पक्षाशीही केंद्र सरकारने संपर्क सुरू केला आहे. संसदेतील मतदानापूर्वी आपली संख्या निश्चित करण्यावर सरकारचा भर आहे.

एमपीएससी अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार वाघोलेंकडे

मुंबई । महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार आयोगाचे सदस्य सतीश वाघोले यांच्याकडे देण्याचा निर्णय राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी घेतला आहे. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी शुक्रवारी यासंदर्भातील आदेश निर्गमित केला.



एमपीएससीमधील कथित पेपरफुटी प्रकरणी पुण्यात मोठे आंदोलन झाले होते. विद्यार्थ्यांनी आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोगावरील आरोपांची न्यायालयीन चौकशी जाहीर केल्यानंतर चौकशी पूर्ण होईपर्यंत रजेवर जाण्याचा निर्णय विवेक भीमनवार यांनी घेतला. या पार्श्वभूमीवर राज्यपालांनी आयोगाच्या अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सतीश वाघोले यांच्याकडे सोपवला आहे.